अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादा


महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य पुणे**
**यांचे कार्यालय,**
५ बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत,दुसरा मजला, पुणे-४११ ००१
Email Id comm.transfer2023@gmail.com


जा.क्र.आस्था/कक्ष-२/समुपदेशन/बदली धोरण-२३/गट-ब/२०२३/1545 दिनांक : २८ मार्च, २०२३

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (प्रशासन/ लेखापरिक्षण) (सर्व)

**विषय :- समुपदेशनाव्दारे सर्वसाधारण बदल्या – सन २०२३**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील प्रत्यक्ष रिक्त,संभाव्य रिक्त पदाची यादी व अवघड क्षेत्रातील / बिगर अवघड क्षेत्रातील बदली पात्र अधिकाऱ्यांची यादी प्रसिध्द करण्याबाबत**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२ दि.०९/०४/२०१८ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१७/ प्र.क्र.४१५/ कार्या १२, दि.२१/११/२०२२ अन्वये राजपत्रित गट-ब मधील अधिकारी तसेच गट-क व गट-ड मधील कर्मचारी यांना समुपदेशनाव्दारे बदलीचे धोरण लागू करण्यात आले आहे. समुपदेशन बदली धोरणाप्रमाणे प्रत्यक्ष रिक्त पदे व माहे मे २०२३ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची यादी तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील अवघड क्षेत्रातील बदलीपात्र व बिगर अवघड क्षेत्रातील बदली पात्र अधिकारी यांच्या दोन स्वतंत्र यादया माहे मार्च अखेर पर्यंत प्रसिध्द करणे आवश्यक आहे. समुपदेशन बदली धोरणानूसार माहे मार्च अखेर पर्यंत प्रसिध्द करावयाच्या यादया सोबत जोडलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या विभागातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांना (नियमित/ प्रतिनियुक्ती) सोबत जोडलेल्या यादया दि.३१/३/२०२३ पर्यंत ई-मेल अथवा Whats App व्दारे तात्काळ पोहोच होतील याची दक्षता घ्यावी.

**(अनिल कवडे)**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी -

१. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (सस्नेह)
२. मा. आयुक्त वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपुर (सस्नेह)
३. मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे (सस्नेह)
४. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई.
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. विशेष कार्य अधिकारी (लेखापरीक्षा मंडळ) (पदुम) महाराष्ट्र राज्य, मुंबई

७. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) महाराष्ट्र राज्य मुंबई
८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
९. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
१०. कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कार्यासन, मुख्यालय, पुणे

यांना कळविण्यात येते की, सदर पत्रासोबत जोडलेल्या यादया सहकार आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर दि.३१/०३/२०२३ पर्यंत प्रसिध्द करण्यात याव्यात.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.